Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

April - 2023

( CDV ) 405

# INDIAN ECONOMY TOWARDS AZADI KA AMRIT MAHOTSAV YEAR: ACHIVEMENTS AND CHALLENGES




Chief - Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive-Editor
Prof (Dr.). S. G. Talnikar
Principal
Toshniwal Arts, Commerce
& Science College, Sengaon
Tq: Sengaon, Dist. Hingoli

Editor
Prof.(Dr.) P. B. Patil
Head Department of Economics.
Toshniwal Arts, Commerce
& Science College, Sengaon
Tq: Sengaon, Dist. Hingoli.

Co-Editor
Mr. B.J. Gaikwad
Department of Economics
Toshniwal Arts, Commerce
& Science College, Sengaon
Tq: Sengaon, Dist. Hingoli.

Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS.

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

239

| | | |
|---|---|---|
| 22 | Groundwater Impact on Rural Agricultural Economic - A special emphasis on Marathwada Region, Maharashtra, India **Dr.Udaykumar L. Sahu** | 93 |
| 23 | The Impact of Modern Technologies on Human Intelligence **Durga Panjabrao Kokare** | 96 |
| 24 | Entrepreneurship Development and Small Scale Industries in Maharashtra **Dr. Ajay P. Kunte** | 98 |
| 25 | Indian Expatriate workforce in Saudi Arabia **Abdul Musvver, Dr. Sajid Ali** | 100 |
| 26 | Service Sector: Growth Engine for Indian Economy **Prof. Sanjay B. Phad** | 104 |
| 27 | A Study Of Policies Measures To Control Inflation **Vaibhav Sheshrao Bangar** | 108 |
| 28 | भारतीय अर्थव्यवस्था और गरीबी डॉ. बबिता बी. शुक्ला | 111 |
| 29 | भारतीय कृषि और अर्थव्यवस्था डॉ. धर्म सिंह मेहरा | 113 |
| 30 | हिंदी के आदिवासी जीवन केन्द्रित उपन्यासों में आर्थिक परिवेश डॉ.पजई शंकर रामभाऊ | 123 |
| 31 | भारतीय अर्थव्यवस्था में महिलाओं की भूमिका शुभम अविनाश महाजन , प्रा.डॉ. पांडुरंग बी. पाटील | 125 |
| 32 | उपन्यास में आर्थिक परिवेश - अलका सरावगी प्रा. घन प्रमोद किशनराव | 129 |
| 33 | भारतातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाची सद्य:स्थिती आणि कोरोनाचा परिणाम डॉ. शिवाजी पाते | 133 |
| 34 | आर्थिक विकासात लघू उद्योगांची भूमिका डॉ. सुरेश त्रिं. सामाले | 137 |
| 35 | भारतातील प्रमुख तेलबियांच्या क्षेत्रफळ, उत्पादन आणि उत्पादकतेचा अभ्यास डॉ. एस. एस. पतंगे, प्रा. आर. जी. शेवलीकर | 141 |
| 36 | भारतीय अर्थव्यवस्था आणि परदेशी गुंतवणूक शुभम अविनाश महाजन , प्रा.डॉ. दिलीप काकडे | 145 |
| 37 | भारतीय अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास अविनाश बेगाजी वानखेडे, प्रा.डॉ. पांडुरंग बी. पाटील | 149 |
| 38 | भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतकऱ्यांच्या आत्महत्या: एक अभ्यास प्रा. डॉ. रामदास धो. मुक्टे | 154 |
| 39 | भारतीय अर्थव्यवस्थेतील पायाभूत सुविधांचा विश्लेषणात्मक आढावा प्रा.डॉ.नागनाथ विठ्ठलराव कांबळे | 158 |
| 40 | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार प्रा. वाघमारे के. एच. | 161 |
| 41 | दारिद्रय आणि भारतीय अर्थव्यवस्था प्रा.डॉ. अशोक गंगाराम अंभोरे | 164 |



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



240

'B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) – 8.632, Issue NO, 405(CDV)
ISSN : 2278-9308 April, 2023

# भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतकऱ्यांच्या आत्महत्या: एक अभ्यास

प्रा डॉ रामदास धो. मुक्टे
शिवाजी महाविद्यालय हिंगोली.
मो. नं.9822503094

घोषवारा

भारतीय कृषीप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक गंभीर समस्या आहे. ज्या अर्थव्यवस्थेत एकूण लोकसंख्येपैकी 64 टक्के लोकसंख्या ही कृषी व कृषी वर आधारित उद्योगाशी संबंधित आहे. विशेष बाब म्हणजे अर्थव्यवस्थेतील ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे रोजगाराचे व उपजीविकेचे प्रमुख साधन कृषीक्षेत्र आहे. कृषी क्षेत्रात विशेषतः हरितक्रांतीच्या नंतर मोठे बदल झाले आहेत. उत्पादनही मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. हा लाभ कृषी क्षेत्राला दिसून येतो. परंतु दुसऱ्या बाजूचा विचार करता कृषी क्षेत्रातील उत्पादन खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्या प्रमाणामध्ये मात्र कृषी उत्पादनाला मिळणारी किंमत अल्प आहे यामुळे उत्पादन खर्च पेक्षा कमी किंमतीला मालाची विक्री शेतकऱ्यांना मजबूरने करावी लागते. त्याचबरोबर कृषी क्षेत्रा मध्ये अर्थव्यवस्थेतील उद्योग सेवा क्षेत्राच्या तुलनेत आधुनिकीकरण व विकास कमी आहे. क्षेत्रातील संशोधन हे तर नगन्या स्वरूपाचे आहे. नैसर्गिक संकटे त्यामध्ये पूर, दुष्काळ आहे निसर्गावरचे कृषीचे अवलंबित व मोठे आहे,यामुळे वेळी अवेळी पडणाऱ्या पावसामुळे शेती उत्पादनाचे प्रचंड नुकसान होते. अनेक वेळा लोड शेडिंग असल्यामुळे बोर विहिरीमध्ये पाणी असून सुद्धा पिकांना वेळेवर पाणी उपलब्ध होत नाही पिके पाण्याविना सुकतात अशी स्थिती आहे. एकूण परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो संकटे दूर करता करता तो अपयशी ठरतो आणि त्यातून आत्महत्या सारख्या मार्गाचा स्वीकार करतो हे दिसून येते. अशा स्थितीत सरकारने उत्पादन खर्चावर आधारित कृषी मालाचे आधारभूत किमान ठरवावे, शेतीवर आधारित लघु व मोठ्या उद्योगांची उभारणी करावी, शेतकऱ्यांना भांडवल उपलब्ध करून द्यावे, सिंचन सोय उपलब्ध करून द्यावी, विद्युत 24 तास उपलब्ध व्हावी. शेतकऱ्यांच्या मालाची साठवणूक करण्यासाठी प्रत्येक गावोगावी शासकीय गोडाऊनची व्यवस्था करून द्यावी, अशा प्रकारचे उपायोजना जर केल्या तर अर्थव्यवस्थेतील शेतकऱ्यांच्या आत्महत्या निश्चितपणे थांबू शकतील.

संज्ञा

कृषीप्रधान, साधने, पंचवार्षिक, नैराश्य, उदासीनता, वास्तवता, दुष्काळ,पूर.

प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर विशेषतः दुसऱ्या पंचवार्षिक योजने पासून अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राशिवाय उद्योग व सेवा क्षेत्राला नियोजनामध्ये स्थान देऊन या क्षेत्राच्या विकासावर अधिक भार देण्यात आला आहे. स्वातंत्र्याच्या कालावधीत अर्थव्यवस्थेत उद्योग व सेवा क्षेत्रांचा बऱ्यापैकी विकास झाला आहे तरीपण अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे महत्त्व कमी झालेले नाही. आज स्वातंत्र्याची 75 वर्षे पूर्ण झाली तरी भारतीय अर्थव्यवस्थेत ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमुख उपजीविकेचे साधन हे कृषिक्षेत्र आहे.अर्थव्यवस्थेत सर्वात जास्त रोजगार निर्मिती म्हणून प्रशिक्षणाकडे बघितले जाते.'भारतीय राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा 2020-21 मध्ये 20.2%टक्के इतकाआहे. तर 64 %लोकसंख्या कृषी क्षेत्राशी संबंधित आहे'[1]. इतर अर्थव्यवस्थेच्या तुलनेत हा वाटा महत्त्वपूर्ण आहे. तसेच औद्योगिक क्षेत्राला कच्च्या मालाचा पुरवठा करणारे क्षेत्र म्हणूनही कृषी क्षेत्र ओळखले जाते. मानवी घटकांना जीवनाच्या आवश्यक असणाऱ्या अन्नधान्याचे उत्पादन कृषी क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात होत असून आज भारतीय अर्थव्यवस्था ही अन्नधान्यांमध्ये स्वयंपूर्ण झालेली आहे.भारतीय

Assistant Professor
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS

अर्थव्यवस्थेचे जागतिक स्तरावर कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून वर्णन केले जाते.भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राच्या विकासामध्ये व एकूण अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. परंतु भारत सरकारकडून दुसऱ्या पंचवार्षिक योजने पासून कृषी क्षेत्राच्या विकासाला औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या तुलनेत कमी महत्त्व देण्यात आले आहे. याचा परिणाम कृषी क्षेत्राचा विकास अपेक्षित प्रमाणात न होता उलट अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्या पैकी एक समस्या म्हणजे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या ही आहे.'2005 पासून सुरू झालेले शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सतरा आजही सुरू आहे.दर 1हजार लोकसंख्येमागे 2 शेतकरी आत्महत्या करतात. भारतीय कृषी प्रधान अर्थव्यवस्थेचा कणा शेती आणि शेतकरीच आहे. म्हणूनच शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा एक मूलभूत घटक आहे.'[2]

संशोधनाची आवश्यकता

भारतीय कृषी प्रधान अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणे हे भारताच्या दृष्टिकोनातून एक अपमानास्पद घटना आहे. शेतीमध्ये निर्माण झालेल्या समस्या जसे की, शेती क्षेत्रात सिंचन,भांडवलाचा, चांगल्या दर्जाचे रस्ते, दर्जेदार बी-बियाणे, कृषी तंत्रज्ञान व कृषी व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना प्रशिक्षणाचा अभाव या प्रमुख समस्या बरोबरच कृषी क्षेत्राचे निसर्गावर अवलंबून असलेले अवलंबित्व आणि वेळी अवेळी पडणारा पाऊस,दुष्काळ आणि नैसर्गिक संकटे, तसेच शेतीमालाला योग्य किंमत न मिळणे या समस्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहे. शेतकऱ्यांमध्ये नैराश्य, उदासीनता निर्माण झाली आहे काय आणि यातूनच तो आत्महत्या करण्याचा मार्ग स्वीकारून आपली जीवन यात्रा संपवतो हा एक गंभीर प्रश्न कृषीप्रधान अर्थव्यवस्थेसमोर निर्माण झाला आहे याचा अभ्यास करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन प्रस्तुत लघु संशोधन करण्यात आले आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

1. भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या व्याप्तीचे विश्लेषण करणे.
2. शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या कारणांचा आढावा घेणे.
3. भारतात कोणत्या राज्यामध्ये सर्वात जास्त आत्महत्या होतात त्याचा आढावा घेणे.
4. शासनाने केलेल्या उपाययोजनांचे विश्लेषण करणे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत लघु संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या स्त्रोता पैकी द्वितीय स्त्रोतांचा किंवा पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधनासाठी आवश्यक असणारे तथ्य किंवा साधन सामग्री संशोधकाची स्वतःची नसून ती अन्य व्यक्ती किंवा संस्था यांच्याद्वारे संकलित करून प्रकाशित केलेली आहे,ती लिखित स्वरूपात उपलब्ध आहे. ज्यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित कागदपत्रे, अहवाल,अभिलेख हस्तलिखित साहित्य,संदर्भात संदर्भ ग्रंथ, पुस्तके यांचे समावेश आहे.

विषय विवेचन

A)शेतकरी आत्महत्या सारख्या मार्गाचा स्वीकार का करतात?

भारतीय कृषी क्षेत्रात ज्या समस्या आहेत या समस्या अलीकडील काळात किंवा नव्याने निर्माण झालेल्या समस्या नाहीत. जसे कृषी क्षेत्राचे निसर्गावर असलेल्या अवलंबित्व स्वातंत्र्य काळापासून किंवा त्यापूर्वीपासूनच आहे.स्वातंत्र्यानंतर सरकारने कृषी क्षेत्राचे निसर्गावरील अवलंबित्व कमी व्हावे यासाठी प्रयत्न म्हणून धरणे, कालवे,लघु सिंचन प्रकल्प,कोल्हापुरी बंधारे,नद्या वरील बंधारे,शेततळे अशा अनेक प्रकारच्या उपयोजना केल्या आहेत. ज्यामधून कृषी क्षेत्राला सिंचनाच्या सोयीसुविधा उपलब्ध होतील. हरित क्रांतीच्या मदतीने कृषी क्षेत्राला ट्रॅक्टर,मळणी यंत्र,विद्युत पंप,सिंचनाची साधने आधुनिक बी-बियाणे अशा प्रकारची आधुनिक व अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांच्या जाती उपलब्ध झाल्या आहेत. या सर्व घटकांचा परिणाम म्हणून कृषी तील उत्पादनात वाढ झाली आहे ही एक बाजू खरी असली तरीही दुसरी बाजू म्हणजे कृषी उत्पादनाला बाजारपेठेत मिळणारी किंमत ही होय. जेव्हा आपण दुसऱ्या बाजूचा विचार करतो त्यावेळेला असे दिसून येते की,बाजारपेठेत कृषी मालाला मिळणारी किंमत ही कृषी मालाच्या

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS.)

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) - 8.632, Issue NO, 405(CDV)
ISSN : 2278-9308
April, 2023

नुकसान भरपाई मिळत नाही. तसेच सरकारकडून पिक विमा योजना राबवल्या जातात या योजनेचा लाभ घेण्यासाठी स्वतः आपल्या शेतात जाऊन पिकासोबत फोटो घेऊन तो ऑनलाइन वेबसाईटवर अपलोड करायचा आहे अशा प्रकारच्या इतर प्रक्रिया शेतकऱ्याकडून होत नाहीत आणि याचा परिणाम शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पासून वंचित राहावे लागते. शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज वेळेवर उपलब्ध होत नाही. अनेक वेळेला शेतकऱ्यांचे सिविल खराब असल्यामुळे बँकांना कर्ज पुरवठा करू शकत नाही. अशाच स्थितीत शेतकरी हा खाजगी सावकारांकडून कर्ज घेऊन आपल्या गरजा पूर्ण करतो. आणि तो अधिक व्याजाने कर्जाची परतफेड करतो आर्थिक संकटात येत असतो.

शेवटी महात्मा फुले म्हटल्याप्रमाणे,'शेतकरी हा कर्ज मध्ये जन्मतो,कर्जत वावरतो आणि कर्जात मरतो' हे वास्तव स्थिती आज भारतीय अर्थव्यवस्थेतील कर्जबाजारी शेतकऱ्यांची दिसून येते.

संशोधनाचे निष्कर्ष

1. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होण्यास प्रभावी कारण म्हणजे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्च जास्त व मिळणारे किंमत कमी हे आहे.
2. शेतकऱ्यांचा अनुत्पादक खर्च हे मोठ्या प्रमाणात होत असतो यामुळेही शेतकरी कर्जामध्ये जात आहे.
3. शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्च चा विचार करून त्यांच्या मालाची किंमत ठरवली तर आत्महत्या कमी होऊ शकतात.
4. शासनाने शेतकऱ्यांनी आत्महत्या थांबवण्यासाठी तात्पुरते उपयोजना करून आत्महत्या थांबत नाही तर त्यासाठी कायमस्वरूपी उपाय योजना करणे आवश्यक आहे. त्यामध्ये शेती क्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा, कृषी बाजारपेठा विकसित करणे, उत्पादन खर्चानुसार किंमत देणे, वाहतूक साठवणूक या सोयी सुविधा उपलब्ध करून देणे, व कृषीवर आधारित उद्योगांची निर्मिती करणे.
5. शेतकऱ्यांनी बाजारपेठेतील मागणी पुरवठ्याचा विचार करा उत्पादन करणे आवश्यक आहे.

अशा प्रकारचे प्रमुख निष्कर्ष प्रस्तुत संशोधनाचे सांगता येतात.

संदर्भसूची

1. m. Maharashtratimes.com
2. www.marathisocial.com
3. marathi.abplive.com
4. esakal.com
5. उपरोक्त संदर्भ 3

*रावसाहेब जाधव, 2004,भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास विषयक समस्या, मीना प्रकाशन, सिंधुदुर्ग

*रुद्र दत्त व सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, एस. चंद्र पब्लिशर्स नवी दिल्ली 2010

*के.एच. ठक्कर,लोकसंख्याशास्त्र,फडके प्रकाशन, कोल्हापूर 2005

*एस.के.मिश्रा भारतीय अर्थव्यवस्था,हिमाचल पब्लिकेशन हाऊस, नवी दिल्ली.2009

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)